श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

मे २०२५ | वर्ष – १३ अंक – ५ | मासिक, पाने ८ | Regn.No. - MAHMAR/2022/86035

## समर्थ नर्सिंग कॉलेजमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी




*निबंध स्पर्धा पारितोषिक वितरण – डावीकडून – सुहानी भिमटे, रवी यादव (नर्सिंग ट्युटर),जेस्सी जेकब (व्हाईस प्रिन्सिपल) आणि वैशाली दळवी(असो. प्रोफेसर)*

दि.१४ एप्रिल १८९१ रोजी भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म झाला. त्यांची १३४वी जयंती मोठ्या उत्साहात सगळीकडेच साजरी करण्यात आली. समर्थ नर्सिंग कॉलेजमध्येसुद्धा विद्यार्थ्यांनी दि. १२/०४/२०२५ रोजी ही जयंती आनंदात साजरी केली. कार्यक्रमाचे पूर्ण आयोजन जी.एन.एम.च्या दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांनी श्री. सुरज दुधडेसर यांच्यामार्गदर्शनाखाली केले.

या जयंतीच्या कार्यक्रमानिमित्त सकाळी ९.३० वाजता निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये एकूण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामधून ३ विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर १२ वाजता पारंपरिक दीपप्रज्वलनाने आणि बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. कार्यक्रमासाठी नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्य प्रा. तेजल सुर्वे आणि उपप्राचार्य प्रा. जेसी जेकॉब व इतर शिक्षक वर्ग उपस्थित होते. प्रतिमापूजन झाल्यावर विद्यार्थ्यांची भाषणे झाली त्यामध्ये त्यांनी बाबासाहेबांची जीवनशैली, कार्य यांचा उल्लेख केला. नंतर निबंध स्पर्धेच्या विजेत्यांना बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला. आंबेडकर जयंती उत्सवाने विद्यार्थ्यांना समता, न्याय आणि शिक्षण या मूल्यांचे चिंतन करण्यासाठी अर्थपूर्ण व्यासपीठ उपलब्ध केले. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना आणि घटनात्मक मूल्यांबद्दल आदराची भावना निर्माण करण्यात हा कार्यक्रम यशस्वी ठरला.

# वैद्यकीय क्षेत्रातील प्रगती आणि वालावलकर रुग्णालयातील अद्ययावत सुविधा – रुग्णालयाद्वारे परिसंवादांचे आयोजन



*परिसंवादाला गावोगावी उत्स्फूर्त प्रतिसाद*



*परिसंवादात सहभागी डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. नेताजी पाटील आणि डॉ. सुनील नाडकर्णी आणि अन्य डॉक्टर्स*

वैद्यकीय क्षेत्रात वाऱ्याच्या वेगाने प्रगती होत असताना कोकणातील खेड्यापाड्यात सेवा देणाऱ्या डॉक्टर्सना याबद्दल अवगत करावे आणि पर्यायाने त्याचा लाभ रुग्णांना मिळावा ह्या उद्देशाने वालावलकर रुग्णालयाने एक अनोखा कार्यक्रम सुरू केला आहे. गावात अद्ययावत आरोग्य सुविधांची कमतरता असतानादेखील उपचार करताना काय काळजी घ्यावी जेणेकरून रुग्णाचे दुखणे कमी होईल याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी काही तालुक्यांच्या ठिकाणी परिसंवाद आयोजित करण्यात आले. चिपळूणमधील ३९, दापोलीमधील ४०, गुहागरमधील ३७, मंडणगडमधील २६, माणगावमधील ७२, रत्नागिरीमधील ८०, राजापूरमधील ५१ आणि खेड आणि देवरुखमधील ४० डॉक्टरांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. हे कार्यक्रम त्या त्या गावातच आयोजित करण्यात आले होते. सर्व डॉक्टर्सनी वालावलकर रुग्णालयात एकाच छताखाली मिळणाऱ्या सर्व सोयींचे कौतुक केले.

या चर्चासत्रांसाठी डॉ. सुनील नाडकर्णी (मानेच्या मणक्याचे तज्ज्ञ),डॉ. आनंद जोशी (पोटाचे आणि यकृत, स्वादुपिंडाचे विकार), डॉ. सुवर्णा पाटील (एमडी मेडिसिन), डॉ. नेताजी पाटील (रेडिओलॉजिस्ट), डॉ. अभय गोंधळे (न्युक्लिअर मेडिसिन), डॉ. मृदुल भटजीवाले (न्यूरॉलॉजिस्ट) डॉ. प्रतीक शहाणे (कान, नाक, घासतज्ज्ञ) आणि अस्थिरोग तज्ज्ञ आणि स्पाईन स्पेशालिस्ट डॉ. ओंकार सुदामे यांनी मार्गदर्शन केले.

# रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथ यांची सदिच्छा भेट आणि अभिप्राय

''आज आम्ही सर्व सदस्यांनी या संस्थेत भेट दिली. येथील कार्य, संशोधन, क्रीडासंकुल, मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, शाळा येथे चाललेले कार्य पाहून खरोखर दंडवत घालावा असेच आहे. प्रत्येक कार्यामागे माणसाचा विचार करून या सर्व करण्याची आणखी केली जाते. त्यामुळे कार्याचा दर्जा आणि ओलावा अत्युच्च दर्जाचा असाच आहे. गुरुमहाराजांच्या आशीर्वादाची कार्यशक्ती (सामर्थ्य) आहे याचे यथार्थ दर्शन येथे होते. येथील सर्व लोकांना भेटून माणसाच्यामध्ये समर्पण वृत्ती काय असते याचा प्रत्यय येतो. यापेक्षा मोठे समाजकार्य, ईश्वरसेवा आम्ही आजपर्यंत पाहिली नाही. आम्हास येथे येऊन खूप आनंद झाला. खूप खूप शुभेच्छा यातून काही प्रेरणा घेण्याची परमेश्वर आम्हांस बुद्धी देवो.'' – ***रोटरी क्लब ऑफ पुणे (साऊथ)***



*डावीकडून – नंदन हांडे, विनोदभाई अग्रवाल, डॉ. नेताजी पाटील, सुभाष करंदीकर, राजेश बेळगावकर, श्रीकांत परांजपे, डॉ. सुवर्णा पाटील, रवींद्र प्रभुणे*

# विविध क्रीडा स्पर्धांमध्ये नर्सिंग विद्यार्थ्यांचा सहभाग

समर्थ नर्सिंग कॉलेज कासारवाडी, सावर्डे येथील नर्सिंग विभागाच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच पार पडलेल्या विविध आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

इन्स्टिट्युट ऑफ नर्सिंग, कसाल, सिंधुदुर्गतर्फे ‘आंतरमहाविद्यालयीन चॅम्पिअनशिप २०२५ - खो खो स्पर्धा दि. ७ आणि ८ मार्च २०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये SVJCT च्या जी.एन.एम. आणि बी.एस्सी.च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता आणि अतिशय उत्कृष्ट खेळ करून त्यांनी चॅम्पिअनशिपचा चषक पटकावला. यामध्ये संकेश दुर्गोली, अभिजित पावरा, सिद्धेश वरेकर, आदित्य ननावरे, प्रणय महाडिक, शुभम शिरसाट, ओम गित्ते, अनुप हरचकर, श्रेयस चव्हाण, प्रणय वाघमारे आणि प्रफुल्ल जगकर या विद्यार्थ्यांचा समावेश होता. या कामगिरीमुळे महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल झाले असून विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.




*कसाल येथील स्पर्धेतील खो-खो विजेते*

तसेच डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज, जळगाव इथे आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांचे (पायरेक्सिया -२०२५) आयोजन केले होते, त्यामध्ये क्रिकेट, व्हॉलीबॉल, फुटबॉल, बास्केटबॉल इ. खेळांचा समावेश होता.

त्यामध्ये भ.क.ल. वालावलकर मेडिकल कॉलेज समवेत समर्थ नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी फुटबॉल, व्हॉलीबॉल, आणि क्रिकेट या खेळांमध्ये सहभाग घेतला होता. इथेसुद्धा आमच्या विद्यार्थ्यांनी फुटबॉलमध्ये दुसरा क्रमांक पटकावला आणि व्हॉलीबॉल व क्रिकेटमध्ये सहभागाबद्दल चषक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धांसाठी कॉलेजमधील शिक्षक श्री. रवी यादव आणि श्री. प्रसाद शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, नियमित सराव, तसेच महाविद्यालयातील क्रीडा विभागाचे मार्गदर्शन व प्रेरणा यांचे मोठे योगदान आहे. क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागामुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, शारीरिक तंदुरुस्ती, आणि आत्मविश्वास वाढीस लागतो हे या वेळी पुन्हा सिद्ध झाले.

महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील काळात अधिक उत्तम कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.




*पायरेक्सिया - २०२५ फुटबॉल उपविजेते*

# जॉन्सन अँड जॉन्सन व्हॅनमध्ये सर्जिकल स्किल्स शिकण्याची सुसंधी

डेरवण हॉस्पिटलने सर्व विद्यार्थ्यांना जॉन्सन अँड जॉन्सन व्हॅनमध्ये सर्जिकल स्किल्स शिकण्याची संधी दिली. शल्य चिकित्सेत प्रावीण्य मिळविण्यासाठी शस्त्रक्रिया कौशल्य विकास महत्त्वपूर्ण आहे. प्रशिक्षणामुळे रुग्णाची सुरक्षा आणि शस्त्रक्रियेची परिणामकता वाढते. शस्त्रक्रियेच्या तंत्रात प्रावीण्य मिळविण्यासाठी सरावातील सातत्य आवश्यक आहे. वालावलकर रुग्णालय व ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयातर्फे एमबीबीएस, नर्सिंग, फिजिओथेरपी, ज्युनिअर रेसिडेंट आणि बीपीएमटी विद्यार्थ्यांसाठी जॉन्सन अँड जॉन्सन यांच्या सहकार्याने दि. २७ ते २९ मार्च२०२५ या कालावधीत 'बेसिक स्किल ट्रेनिंग प्रोग्रॅम'चे आयोजन करण्यात आले होते. जॉन्सन अँड जॉन्सन व्हॅनमध्ये हे प्रशिक्षण दिले जाते. व्हॅनची विद्यार्थी क्षमता केवळ २२ विद्यार्थी होती म्हणून बीएस्सी १ आणि २ सेमिस्टरच्या विद्यार्थ्यांचे ५ गट तयार करून त्यांना प्रशिक्षणासाठी पाठवले. प्रत्येक गटासाठी १ तास देण्यात आला होता. या सत्रादरम्यान विद्यार्थ्यांना शस्त्रक्रियेसाठी मदत करताना ग्लोव्ह्ज, गाऊन कसे घालायचे आणि काढायचे याचा क्रम समजण्यासाठी एक व्हिडिओ दाखविण्यात आला आणि त्यानंतर त्यांना शस्त्रक्रियेचे विविध तंत्र दाखवण्यात आले. विद्यार्थ्यांनाही सराव करण्याची संधी मिळाली आणि प्रशिक्षकाने विद्यार्थ्यांचे निरीक्षण करून त्यांच्या चुका दुरुस्त केल्या. विद्यार्थ्यांसाठी हा खूप नवीन आणि आश्चर्यकारक अनुभव होता. अशा प्रकारे सर्व गटांसाठी प्रशिक्षण दिले जाते आणि विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळतो.



*जॉन्सन अॅन्ड जॉन्सनच्या व्हॅनमध्ये प्रशिक्षण आणि प्रशिक्षणार्थी*



# पारंपरिक गणेशोत्सव सजावटीसाठी डेरवण कोहार्टच्या मुलींनी घेतले प्रशिक्षण



ज्योती अय्यर आणि चंद्रिका कामत (उभ्या- डावीकडून सातव्या आणि आठव्या) प्रशिक्षणार्थी मुलींसमवेत



पर्यावरणस्नेही गणपती-सजावट आणि हस्तकला प्रशिक्षण

यंदा डेरवण येथील S.V.J.C.T. कौशल्य विकास केंद्रात आयोजित केलेल्या हस्तकला प्रशिक्षणात चिपळूण, संगमेश्वर आणि गुहागर या तालुक्यांतील एकूण २४ मुलींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. गणपती सजावटीसाठी इको-फ्रेंडली व पारंपरिक हस्तकला शिकवण्याचे हे प्रशिक्षण आर्ट्स अँड क्राफ्ट्सच्या प्रशिक्षिका चंद्रिका कामत (मुंबई) यांनी दिले. त्या विविध नामवंत टीव्ही चॅनल्सवर 'आर्ट अँड क्राफ्ट' विषयावर डेमो कार्यक्रम देतात. तसेच मुंबई व दिल्ली येथील टीव्ही कलाकार व फॅशन डिझायनर्ससाठी कार्यशाळा घेतात. त्यांनी 'Cancer Patients Association' या संस्थेच्या चॅरिटी फॅशन शोसाठी शायना एन.सी. यांच्या डिझाईननुसार आणि हेमंत त्रिवेदी यांच्या दिग्दर्शनाखाली खास साड्या रंगवल्या आहेत. त्या दरवर्षी गणपती व दिवाळीनिमित्त विविध वर्कशॉप घेतात.

मुलींना प्लीटेड फ्लॉवर, सनफ्लॉवर, फॅन फोल्ड यांसारख्या सजावटी शिकवल्या. जंबो फ्लॉवर, रंगीबेरंगी मोर बनवण्याचं प्रशिक्षण देण्यात आलं. प्रत्येक मुलीला स्वतःचे साहित्य दिले गेले आणि प्रत्यक्ष कृती करून घेतली गेली. मुलींनी सांगितलं की, गणपती डेकोरेशनसारखी हस्तकला आपण व्यवसाय म्हणून सुरू करू शकतो आणि या कौशल्याचा वापर करून उत्पन्नही मिळवू शकतो. या उपक्रमामुळे कामत मॅडम यांच्या मार्गदर्शनाने मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला असून, त्यांच्यातील सर्जनशीलता खुलली आहे.

## कांथा वर्क प्रशिक्षण

'कांथा वर्क' हा पारंपरिक भरतकामामधील प्रकार आहे. याला 'हॅन्ड एम्ब्रॉयडरी' म्हणतात. नवीन कापडावर, उशांचे अभ्रे, साडी इत्यादीवर हँड एम्ब्रॉयडरी केली जाते. याचे प्रशिक्षण देण्यासाठी 'निकाई फॅशन स्टुडिओ'च्या संस्थापक मृण्मयी अवचट या आल्या होत्या. त्या एक फॅशन डिझाइनर आणि उद्योजिका आहेत. त्यांनी पर्ल अकॅडमीमध्ये फॅकल्टी म्हणून काम केलेले आहे. लंडन येथील फॅशन डिझायनिंगमध्ये त्यांनी एक्झिक्युटिव्ह प्रोग्राम पूर्ण केला आहे.

दि. २२ आणि २३ मे २०२५ रोजी S.V.J.C.T. कौशल्य विकास केंद्र आणि डेरवण कोहट प्रोजेक्टमधील मुलींना कांथा वर्कचे प्रशिक्षण दिले. नवीन बॅचमधील मुलींना लहान आकृत्या असलेले रनिंग स्टीच, मिरर वर्क, सिंधी टाका शिकवण्यात आला. तसेच स्लिप स्टिच, हेमिंग कसे करावे, टेबल-रनरचे फिनिशिंग कसे करावे आणि एम्ब्रॉयडरी करताना त्यात टाक्याची गुंतागुंत न होता स्वच्छ व सुंदर काम कसे करावे हे समजविण्यात आले. काही मुलींना यातून रोजगारही प्राप्त झालेला आहे.



'कांथा वर्क'चे प्रात्यक्षिक



'कांथा वर्क'चे प्रशिक्षण देताना श्रीमती मृण्मयी अवचट

# समर्थ नर्सिंग कॉलेजमध्ये माजी विद्यार्थी मेळावा




*माजी विद्यार्थी/विद्यार्थिनी आणि प्राध्यापकांसमवेत प्राचार्या तेजल सुर्वे*

समर्थ नर्सिंग कॉलेज येथे दि. २९ मार्च २०२५ रोजी नर्सिंग विभागाचा माजी विद्यार्थी मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने व सरस्वती वंदनेने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून कॉलेजच्या प्राचार्य प्रोफेसर तेजल सुर्वे आणि इतर शिक्षकवर्गसुद्धा उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात नर्सिंग व्यवसायाच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. अनेक माजी विद्यार्थ्यांनी आपले अनुभव मांडून नव्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. काही माजी विद्यार्थ्यांनी समाजसेवेसाठी केलेल्या कार्याबद्दल माहिती दिली. आजी-माजी विद्यार्थ्यांमध्ये संवाद साधण्यासाठी विविध खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम आणि गाण्यांची मैफल आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व माजी विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. हा मेळावा सर्वांसाठी एक प्रेरणादायी आणि संस्मरणीय अनुभव ठरला. कॉलेजच्या प्राचार्य प्रोफेसर तेजल सुर्वे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.




*दीप प्रज्वलन करताना जेस्सी जेकब (व्हाईस प्रिन्सिपल), वैशाली दळवी(असो. प्रोफेसर) आणि विद्यार्थिनी*

# विविध क्रीडाप्रकारांची ग्रीष्मकालीन शिबिरे उत्साहात संपन्न



*शिबिरातील क्षणचित्र*



*शिबिरातील क्षणचित्र*

वार्षिक सुट्यांचा सदुपयोग करून आपले क्रीडा नैपुण्य वाढविण्यासाठी, एसव्हीजेसीटी क्रीडासंकुल हे खेळाडूंचे हक्काचे ठिकाण ठरत आहे. दि १० एप्रिल ते मे अखेरपर्यंत विविध नामवंत प्रशिक्षक तसेच खेळाडू, येथील सिंथेटिक ट्रॅक, फुटबॉल ग्राऊंड, सुसज्ज हॉल, आणि जलतरण तलाव अशा आंतरराष्ट्रीय स्तराच्या भौतिक सुविधांचा लाभ घेण्यासाठी आले आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करण्याच्या तयारीसाठी खेळाडूंना येथे प्रगत सुविधा व आधुनिक मार्गदर्शन मिळत आहे. प्रशिक्षण शिबिरामध्ये मुंबई, ठाणे, डोंबिवली, अहमदनगर, कोल्हापूर, सातारा, नाशिक, छत्रपती संभाजीनगर अशा विविध जिल्ह्यांमधून खेळाडूंनी सहभाग नोंदविला. वेगवेगळ्या कालावधीत आयोजित केल्या गेलेल्या, या दोन महिन्यातील विविध शिबिरांमधील निवासी खेळाडूंची संख्या ६६० नोंदविली गेली. ज्यामध्ये ॲथलेटीक्स या खेळासाठी सर्वात जास्त उपस्थिती होती.

मागील चार वर्षांपासून सातत्याने शिबिर आयोजित करणारे मुंबईतील राईझिंग स्टार क्लबचे खेळाडू ॲथलेटिक्स प्रशिक्षण शिबिरासाठी आले होते. प्रशिक्षक योगेश साटम यांच्या मते, क्रीडासंकुलामुळे मिळणारी ऊर्जा ही आम्हाला वर्षभर विविध स्पर्धांमध्ये उत्तम कामगिरी करण्यासाठी प्रेरणा देते. येथील सरावामुळे खेळाडूंमध्ये तांत्रिक सुधारणा होऊन, अपेक्षित प्रावीण्य आत्मसात करता येते. त्यामुळे शिबिरातील खेळाडू स्पर्धेमध्ये चांगली कामगिरी करतात आणि आत्मविश्वासाने स्पर्धांना सामोरे जातात. त्यांनी संस्थेच्या व्यवस्थापनाचे कौतुक करताना, शिबिरासाठी उपलब्ध केलेल्या उत्कृष्ट सुविधांमुळे आणि सहकार्यामुळे शिबिर अधिक यशस्वी होत असल्याचेही सांगितले. तसेच भविष्यातही शिबिर नियमितपणे आयोजित करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे, ज्यामुळे नवोदित खेळाडूंचा विकास होईल आणि क्रीडा क्षेत्रात नवीन प्रतिभा उभारली जाईल.

ठाण्याहून आलेले ॲचिव्हर्स स्पोर्ट्स क्लबचे प्रशिक्षक निलेश पाटकर खेळाडूंच्या संघासोबत महिनाभराच्या प्रशिक्षण शिबिरासाठी उपस्थित होते. त्यांच्या संघात निखिल ढाके, हर्ष राऊत, ऋषभ यादव, आकांक्षा गवादे, मिहिका सुर्वे, श्रेष्ठा शेट्टी, स्मित सरोदे असे राष्ट्रीय खेळाडू सहभागी झाले होते. क्रीडासंकुलातील अंतरराष्ट्रीय दर्जाचे मैदान हे मुख्य कारण असून त्याचबरोबर खेळाडूंना पूरक अशी स्विमिंग, जिम्नॅशियम, इंडोअर स्टेडियम, उत्तम निवास व भोजन व्यवस्था यामुळे मुलांचा सराव परिपूर्ण होतो. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांमध्ये केवळ शारीरिक तंदुरुस्तीच नव्हे, स्वयंशिस्तीचेही धडे गिरविले जातात ज्याची आवश्यकता सध्याच्या युवा पिढीला आहे त्यामुळेच येथे आम्ही शिबिर आयोजित केले असे मत त्यांनी व्यक्त केले.

कल्याण व डोंबिवली येथून ॲथलेटीक्स खेळाडूंचा संघ घेऊन आलेले जिद्द ॲकॅडमीचे प्रशिक्षक जगदीश गावडे, अमोल कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ६० खेळाडूंसाठी क्रीडा शिबिराचे आयोजन करण्यात आले. लहान वयाच्या खेळाडूना ट्रॅक आणि येथील बंदिस्त मैदानात तंदुरुस्तीचा सराव देण्यासाठी आम्ही हे शिबिर आयोजित केले आहे. राष्ट्रीय स्तरारवर प्रतिनिधित्व करणारे खेळाडू कसे सराव करतात हेही या नवोदित खेळाडूंना अनुभवता आले ज्याचा त्यांना भविष्यात नक्कीच फायदा होईल असे गावडे यांनी आवर्जून सांगितले.

याचबरोबर कोल्हापूर येथील आनंदराव चव्हाण विद्यालयचे ३६ खेळाडू, प्रशिक्षक प्रतिक कदम यांच्या मार्गदर्शनाखाली कसून सराव करीत आहेत. येथील हवामान जरी उष्ण असले तरी स्पर्धा काळातील आव्हांनांना सामोरे जाण्याची तयारी करण्यासाठी आम्ही हे शिबिर आयोजित केले आहे. ग्रामीण भागातील खेळाडूंना सरावाबरोबरच आहारविषयक आणि छोट्या दुखपतींमधून सावरण्याचे मार्गदर्शन मिळाले ज्याचा त्यांना पुढील वर्षात फायदा होईल असे मत त्यांनी व्यक्त केले.

याचबरोबर एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलातर्फेही विविध

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com













खेळांच्या उन्हाळी क्रीडा शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. खेळाबरोबरच राष्ट्रहित डोळ्यासमोर ठेवून चारित्र्यसंपन्न खेळाडू निर्माण करण्याचा प्रयत्न या शिबिरामार्फत करण्यात आला. कबड्डी, फुटबॉल, धनुर्विद्या, हँडबॉल, धनुर्विद्या, रायफल शूटिंगसारख्या खेळांची प्रशिक्षण शिबिरे मे महिन्यात क्रीडासंकुलात पार पडली. उन्हाळा असल्यामुळे जलतरणासाठी दिवसातील १२ तासांहूनही अधिक वेळ खेळाडू आणि वालावलकर रुग्णालयाच्या परिसरातील क्रीडाप्रेमींनी जलतरणाचा आनंद घेतला.

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक :** श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवारबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण, पो. सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले.Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०
नोंदणी क्रमांक : MAHMAR/2022/86035